सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

क्रमांक : तंशिसं/१०/Intake Approval/२०२२/ १०२२ दिनांक : 22 NOV 2022

प्रति,
प्राचार्य,
औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांच्या माहितीची पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत....

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक १०/एडीएम/Intake Approval/२०२२/५७८, दिनांक ११.७.२०२२

वरील विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी मंजूर प्रवेश क्षमता, संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास कळविले होते.

त्याअनुषंगाने सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची माहिती दिनांक ०१.१२.२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यत अद्ययावत करावी. माहिती अद्ययावत करताना ती अचूक असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणाऱ्या परिणामांस संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल, या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर. त्यांना कळविण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच आपल्या अधिनस्त सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दिनांक ०१.१२.२०२२ सायं.५.०० वा. पर्यंत अद्ययावत करावी. त्यानंतर कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत/प्रमाणित करता येणार नाही व सदरील माहिती प्रवेश प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

३) कार्यासन क्रमांक ३ (माहिती तंत्रज्ञान कक्ष) ,मुख्य कार्यालय मुंबई.